## उपक्रम – प्राथमिक शाळा

उपक्रमा मध्ये सहभागाबद्दल धन्यवाद. प्राथमिक शाळेतील उपक्रमा बद्दल खालील माहीती आहे.

### शिक्षणाचे महत्व

शिक्षणाशिवाय रेबिजमुळे होणारी जीवितहानी थांबविणे अशक्य आहे. लहान मुलांना रेबिज विषयी माहिती देवून, व तो कसा टाळता येईल आपल्याला हे उद्दिष्ट साध्य करता येईल. मुलांच्या शिक्षणातून आपण त्यांच्या कुटुंबापर्यंत पोहचू शकतो. ज्या मुलांनी या उपक्रमात सहभाग घेतला आहे त्यांच्या घरापर्यंत आपली माहिती पोहचू शकते.

### शैक्षणिक उपक्रमाचे फायदे

या उपक्रमामुळे मुलांना खालील गोष्टींची माहिती मिळते.

- रेबिचा परिणाम
- रेबिज कसा टाळता येईल
- श्वानदंश कसा टाळता येईल.
- रेबिज कसा नाहीसा करता येईल.

### शिक्षण प्राप्त झाल्याचा पुरावा ?

उपक्रमा मध्ये – उपक्रमा पुर्वी व नंतर तपासणीची सोय आहे. तोंडी प्रश्न व प्रश्नमंजुशा या मार्फत ही तपासणी करता येते. माहिती देण्याआधी व दिल्यानंतर मुलांची उत्तरे देण्याची कुवत नोंद करा.

मागावून करावयाच्या कार्यवाईत – दिलेली माहीती लक्षात ठेवायची मुलांची कुवत तपासून पहा. दिर्घकाळामध्ये, श्वान दंशाच्या संख्येमध्ये झालेली घट व कुत्र्यांच्या लसिकरणामध्ये झालेली वाढ यावरुन शिक्षण प्राप्त होईल.

### उपक्रमाचा मतीत अर्थ

मुलांना रेबिज व त्याच्या प्रतिबंधाविषयी माहीती देता येईल – अशी उपक्रमाची मांडणी केली आहे. मुलांची उत्सुकता कायम राखत, जागतिक रेबिज दिनाचा संदेश देण्याकरिता विविध कार्यक्रमाची यामध्ये सोय आहे. मुळ मुद्दयांचा पुनर्उच्चार व भूमिका साकारणे यामुळे मुलांना

माहीती लक्षात ठेवण्यास मदत होते. भूमिका साकारल्यामुळे जी शारिरीक हालचाल होते त्यामुळे लक्ष केंद्रीत करण्याकरता मदत होते. उपक्रमामुळे मुलांमध्ये कुत्र्यांविषयी असुया किंवा भिती निर्माण होऊ नये – यासाठी – कुत्रे जरी घातक असले तरी ते चांगले पाळीव प्राणी होऊ शकतात याची काळजी पुर्वक माहीती दया.

**<u>उपक्रमाचे साहित्य –</u>**

- कॉम्प्युटर व स्क्रिनची सोय असलेला वर्ग
- पावरपॉइंट प्रेझेंनटशन
- कागद व रंगरंगोटीचे साधन